बातमीपत्र

# पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि १० ऑक्टोबर २०२३

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७१४/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,१४३,१४७,१४८ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०७/१०/२०२३ रोजी २३.३० वा रमण नगर गणेश मंदिर येथील सार्वजनिक रोडवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/१०/२०२३ रोजी २०.०० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अमर विजयकुमार उमरानी, वय- २७ वर्षे, रा. ३४, नाईकवाडी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) नितीन पवार, २) आकाश रद्दडगी, ३) मंगेश रद्दडगी, ४) प्रेम खुने, ५) संदिप बाळशंकर व दोन ते तीन अनोळखी इसम सर्व रा. जयभिम कट्टा, अभिषेक नगर, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र प्रसाद पाटील असे वरील ठिकाणी बोलत थांबले असता, यातील वरील आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादी थांबलेल्या ठिकाणी येवून, प्रसाद पाटील यास मागे झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन शिवीगाळ करुन, हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यावेळी फिर्यादी भांडण सोडविण्यासाठी मध्ये गेले असता, फिर्यादीस वरील आरोपीतांनी मिळुन तु कोण आहेस भांडण सोडविणारा म्हणून शिवीगाळ करत आरोपीत क्रं. १ याने तेथेच पडलेला दगड हातामध्ये घेवून फिर्यादीचे डोकीस पाठीमागील बाजुस मारुन दुखापत केली आहे. तसेच आरोपीत क्रं. ४ याने लाकडी वाशाने फिर्यादीच्या उजव्या बाजुस मुक्कामार मारला आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ५१२ गायकवाड- ९६२३३१०२२२ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५७३/२०२३ भादवि ४५२,३२७,४२७ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०९/१०/२०२३ रोजी १३.०० वा ते १३.३० वा चे दरम्यान, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/१०/२०२३ रोजी २१.३० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुनिता अनंत कुलकर्णी, वय- ५२ वर्षे, रा. ०२ झोपडपट्टी, आम्रपाली चौक, विजापूर नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | पुजा विशाल कुलकर्णी, वय- २७ वर्षे, रा. बसवेश्वर तांडा, देगाव नाका, सोलापूर |
| **गेला माल** | : | ५७,०००/- रोख रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी या घरी नसताना, यातील वरील आरोपीत हिने फिर्यादीचे संमतीशिवाय, गेटचे व घराचे मुख्य दरवाजाचे कुलुपाचे नुकसान करुन घरात प्रवेश करुन, घराचे हॉलमध्ये तसेच बेडरुमचे खिडकीची हॉलमधील टिव्हीची काच फोडुन, टि पॉय व बेडरुमधील कपाटाचे काच फोडुन नुकसान करुन, बेडरुममधील बेडवरील ठेवलेल्या पर्स मधील वरील वर्णनाची रोख रक्कम फिर्यादीच्या संमतीशिवाय घेवून गेली आहे म्हणून. तपास:- सपोनि- देशमुख - **८४४६७८५०५३** |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५७४/२०२३ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | लग्नानंतर ७ ते ८ महिन्यानंतर ते दि. ०७/०६/२०२३ रोजी चे दरम्यान फिर्यादीचे सासरी |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/१०/२०२३ रोजी २२.१६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राजश्री शिवपुत्र बनसोडे, वय- ३८ वर्षे, रा. आण्णा कॉलनी, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) शिवपुत्र बनसोडे- पती, २) सिध्दप्पा बनसोडे- सासरे, ३) सरुबाई बनसोडे- सासु, ४) पांडुरंग बनसोडे, ५) संगिता बनसोडे, ६) ललिता निजाप्पा गायकवाड- नणंद, ७) सर्व रा. २२३/३४, आदित्य नगर, नविन आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी मिळुन फिर्यादीस घरातील किरकोळ कारणावरुन भांडण करुन, लग्नात मानपान केला नाही म्हणून सतत शारिरीक व मानसिक त्रास दिला आहे. तसेच आरोपीत क्रं. १ याने फिर्यादीस वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण करुन फिर्यादीस व फिर्यादीच्या मुलीस जिवे मारण्याची धमकी देवून माहेरुन ५ लाख रुपये आणले तर तुला नांदवितो असे म्हणून फिर्यादीस घरातुन हाकलुन दिले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १२०१ जाधव - ९८५०६६०२९९ |

## सलगर वस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १७९/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. ०८/१०/२०२३ रोजी ०७.०० वा चे सुमारास, जिल्हा परीषद शाळा बेलाटी, ता.उ. सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०९/१०/२०२३ रोजी २३.०३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सचिन प्रकाश ढेपे, वय- २४ वर्षे, रा. पाकणी फाटा, पाकणी आश्रम शाळेजवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) बबलु राठोड, २) सागर जाधव, ३) शुभम शेंडगे, सर्व रा. बेलाटी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणी थांबले असताना, तेथे वरील आरोपीत मजकुर हे येवुन मागील भांडणाचा राग मनात धरुन, फिर्यादीस शिवीगाळ, दमदाटी करुन, सर्वांनी मिळुन फिर्यादीस खाली पाडुन लाथाबुक्यांनी मारहाण केली व आरोपीत क्रं. २ याने फिर्यादीचे उजव्या दंडावर चाकुने मारुन फिर्यादीस जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १७१ वाल्मीकी - ८८८८५५५१५५ |